जा.क्र./दक्षता कक्ष/अ-6/प्र.प्रकरणे/परिपत्रक/15 90ह
सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य,पुणे-1,यांचे कार्यालय.
दिनांक :-15/04/2015.

--- परिपत्रक ---

विषय:- <u>सहकार आयुक्त कार्यालयातील " दक्षता " कार्यासनाकडील कामकाजाबाबत.</u>

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयास विभागातील क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या कामकाजाबाबतच्या मोठया प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत असतात व अशा तक्रारीबाबत विभाग निहाय चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करुन चौकशी अधिकारी यांना चौकशी अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात येते. चौकशी अहवाल सादर करीत असताना चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास येतात.

१. चौकशी अहवाल हे त्रोटक स्वरुपाचे असतात.
२. चौकशी अहवाल मुद्देनिहाय सादर केले जात नाहीत.
३. चौकशी अहवालावर स्वयंस्पष्ट अभिप्राय दिले जात नाही.
४. तसेच चौकशी अहवालावर नियंत्रण अधिकारी यांचे अभिप्राय / मत नोंदविले जात नाहीत.
५. चौकशी अहवाल सादर करताना सोबत पुराव्या दाखल कागदपत्रे सादर केली जात नाही.
६. तक्रार अर्जाची चौकशी करीत असताना तक्रारदार, संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांना सुनावणीची संधी दिली जात नाही .

उपरोक्त त्रुटींमुळे अनावश्यक पत्रव्यवहार होऊन प्रकरण विहित मुदतीत निकाली काढणे शक्य होत नाही. त्यामुळे, दक्षता कार्यासनाकडील प्रकरणे विहीत मुदतीत निकाली काढण्याच्या दृष्टीकोणातुन सर्व क्षेत्रीय अधिका-यांना याबाबत सुचना देणे आवश्यक आहे.

तरी क्षेत्रिय अधिकारी यांनी वरिष्ठ कार्यालयास चौकशी अहवाल सादर करताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करुन चौकशी अहवाल सादर करावा.

१. चौकशी अहवाल सादर करताना अहवाल मुद्देसूद व खुलासे व त्यावर अभिप्रायासह सादर करावेत.
२.चौकशी अहवालावरील अभिप्राय हे स्वयंस्पष्ट नमूद करुन त्यांवर नियंत्रण अधिकारी यांनी आपले स्वाक्षरीसह सादर करावेत.
३. चौकशी अहवाल सादर करताना त्यासोबत पुरावे दाखल कागदपत्रे सादर करावीत.
४. तक्रार अर्जाची चौकशी करीत असताना तक्रारदार, संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांना आवश्यकतेनुसार सुनावणीची संधीं देऊन त्यांचे म्हणणे विचारात घेऊन अभिप्रायासह अहवाल सादर करावेत.

(शैलेश कोतमिरे)
अपर निबंधक(प्रशासन)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत:- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना-
१. मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था सर्व
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व
३. कार्यासन अधिकारी(सर्व) मुख्यालय पुणे

प्रत:- सस्नेह रवाना-
१. मा. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट राज्य पुणे.
२. मा. अपर निबंधक, सहकारी संस्था, [illegible] व. व नि./ अ. व नि. सहकारी संस्था, मुख्यालय, पुणे.